**चलनी नोटांना पिना लावू नका :**
**भारतीय रिझर्व्ह बँकेची बँकांना व जनतेला विनंती**
**फेब्रुवारी २५, २००३**

भारतीय रिझर्व्ह बँकेने नोटांच्या गड्डयावर पिना लावण्याच्या बँकांच्या प्रथेवर बंधी घातली आहे. तिने बँकांना बँकिंग नियमन कायदा, १९४९ कलम ३५ (अ) अन्वये, ही जनहितार्थ अधिसूचना, जनतेला, स्वच्छ व चांगल्या नोटा देण्याच्या उद्देशाने केली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँक चांगल्या अवस्थेतील नोटा, पिना न लावता बँकांना व जनतेला देत आली आहे. पण त्यांच्या असे लक्षात आले की, बँका या नोटा पिना लावून परत जनतेला देतात. लोकांना या नोटा काढणे अवधड जात होते. लोकांना इजा होत होती आणि नोटा ही फाटत होत्या. बँका अशा फाटलेल्या नोटा जनतेकडून घेत नव्हत्या. अशा तऱ्हेने चांगल्या नोटांना पिनां मुळे नुकसान होते. त्यामुळे पिना हे चांगल्या नोटांच्या नुकसानीचे प्रमुख कारण असल्याचे लक्षात आले. भारतीय रिझर्व्ह बँक व भारतीय सरकार कडे नोटांना पिना मारण्या विरुद्ध तक्रारी येत होत्या. रिझर्व्ह बँकेने केलेल्या पाहणीनुसार इतर कोणत्याही देशात नोटांना पिना लावण्याची पद्धत नाही. रिझर्व्ह बँक, १९९८ पासून बँकांना पिना न लावण्याचा सल्ला देत होती. आता नोटांना पिना न लावण्याची अधिसूचना नोव्हेंबर २००२ मधे काढण्यात आली आहे. जनतेने रिझर्व्ह बँकेच्या ऊचलेल्या या पावलाचे स्वागत केले आहे. रिझर्व्ह बँकेची कार्यालये, इतर बँकांच्या शाख्या, सरकारी विभाग वगैरेंकडून मिळालेल्या नोटांवर पूर्णतः स्वयंचालित यंत्राद्वारे कडेकोट बंदोबस्तात व क्लोज्ड सर्किट टीव्हीच्या देखरेखी खाली प्रक्रिया करतात.

**अल्पना किल्लावाला**
**महा व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज : २००२-०३ / ८९१**